**<u>राज्य शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा</u>**
**<u>आठवडा लागू करण्याबाबत.</u>**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः समय- २०१६/प्र. क्र. ६२/१८ ( र. व का. )**
मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २४ फेब्रुवारी, २०२०

**वाचा :**

१) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : समय - १०८५ / ६४ / १८ (र. व का.), दिनांक १३ जून, १९८५.

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : समय - १०८५ / ६४ / १८ (र. व का.), दिनांक १२ फेब्रुवारी, १९८७.

३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक : समय - १०८८ /१९ / अठरा (र. व का.), दिनांक ३१ ऑगस्ट, १९८८.

४) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांक : समय १०१९ / प्र. क्र. २८ / १८ (र.व का.), दिनांक ४ जून, २०१९.

**प्रस्तावना :**

शासनाच्या दिनांक १३ जून, १९८५ च्या परिपत्रकान्वये, राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आला होता. तसेच सदर आदेश कोणत्या कार्यालयांना लागू आहेत, याबाबत दिनांक १२ फेब्रुवारी, १९८७ च्या परिपत्रकान्वये स्पष्टीकरणात्मक सूचना देण्यात आल्या. त्यानंतरच्या दिनांक ३१ ऑगस्ट, १९८८ च्या शासन निर्णयान्वये दिनांक १३ जून, १९८५ चे परिपत्रक अधिक्रमित करून शासनाची सर्व प्रशासकीय कार्यालये, दिनांक १ सप्टेंबर, १९८८ पासून प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या शनिवारी बंद राहतील व इतर सर्व शनिवारी पूर्ण वेळ चालू राहतील, अशा प्रकारच्या सूचना निर्गमित केल्या आहेत.

२. तथापि केंद्र शासनाच्या कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा यापूर्वीच लागू झालेला असल्याने यासंदर्भात विविध अधिकारी / कर्मचारी संघटनांकडून होत असलेली मागणी विचारात घेऊन राज्यातील शासकीय कार्यालयांसाठीसुद्धा पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत मंत्रिमंडळ बैठक दिनांक १२ फेब्रुवारी, २०२० मध्ये निर्णय घेण्यात आला असून त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

Scanned with CamScanner

**शासन निर्णय :**

याबाबत साकल्याने विचार केल्यानंतर शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार दिनांक ३१ ऑगस्ट, १९८८ चा शासन निर्णय अधिक्रमित करून शासन पुढीलप्रमाणे आदेश देत आहे :-

(१) दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात येत असून त्यामुळे सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतील.

(२) सर्व शासकीय कार्यालयांच्या कामकाजाची वेळ ४५ मिनिटांनी वाढविण्यात येत असून ती सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी राहील.

(३) तसेच सर्व शासकीय कार्यालयांतील शिपायांसाठी कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील.

(४) उपरोक्त कार्यालयीन वेळेमध्ये दिनांक ४ जून, २०१९ च्या शासन परिपत्रकानुसार दुपारी १.०० ते २.०० या वेळेमधील जास्तीत जास्त अर्ध्या तासाची भोजनाची सुट्टी अंतर्भुत असेल.

(५) ज्या शासकीय कार्यालयांना कारखाना अधिनियम लागू आहे किंवा औद्योगिक विवाद अधिनियम लागू आहे किंवा ज्यांच्या सेवा अत्यावश्यक म्हणून समजल्या जातात, अशा कार्यालयांना व शासकीय महाविद्यालये, तंत्रनिकेतने, शाळा, पोलीस दल, अग्निशमन दल, सफाई कामगार इ. यांना ५ दिवसाच्या आठवड्याबाबतचे आदेश लागू राहणार नाहीत. अशा प्रकारच्या कार्यालयांची यादी परिशिष्ट 'अ' येथे जोडली असून ही यादी विशदीकरणात्मक (Illustrative) आहे व या यादीमध्ये निर्देश केलेल्या प्रकारात मोडणाऱ्या इतर कार्यालयांनासुद्धा पाच दिवसांचा आठवडा लागू राहणार नाही.

२. सदर शासन निर्णय दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून अंमलात येईल.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेताक २०२००२२४११३४५९१४०७ असा आहे. तसेच तो डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anshu Sinha

Digitally signed by Anshu Sinha
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a3a7504068b24f4e7eb0277456c1fe4e5d31e4d0b0fdc81eb8816e33c5735b5b, serialNumber=e71208cc885f6d3c01b374ed0921df256abda4ed94d69472deb566c39b4ee68c, cn=Anshu Sinha
Date: 2020.02.24 11:39:04 +05'30'

**( अन्शु सिन्हा )**
**शासनाचे सचिव (प्र.सु.र.व का.)**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव (५ प्रती) पत्राने



Scanned with CamScanner

२) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव (५ प्रती), मंत्रालय, मुंबई-३२
३) सर्व मा.मंत्री /मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
४) मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद,विधानमंडळ, मुंबई-४०००३२
५) सर्व मा. संसद सदस्य/विधानसभा सदस्य/विधान परिषद सदस्य,
६) आयुक्त, राज्य निवडणूक आयोग (पत्राने), १३वा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ४०० ०३२
७) मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
८) मा.महाअधिवक्ता, महाराष्ट्र राज्य, मा. उच्च न्यायालय, मुंबई
९) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, मुंबई, महाराष्ट्र,
१०) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर, महाराष्ट्र,
११) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-१, मुंबई, महाराष्ट्र,
१२) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर, महाराष्ट्र,
१३) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई-४०००३२
१४) प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई
१५) महाप्रबंधक, मा. उच्च न्यायालय, मुंबई
१६) प्रबंधक, मा. उच्च न्यायालय, (मूळ शाखा), मुंबई
१७) प्रबंधक, लोकायुक्त व उप लोकायुक्त यांचे कार्यालय, १ला मजला, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई ४०० ०३२
१८) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने), बँक ऑफ इंडीया इमारत, मुंबई २३
१९) मा.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, नवीन प्रशासकीय इमारत, मुंबई
२०) मा.राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२१ ) सर्व विभागीय आयुक्त
२२) सर्व जिल्हाधिकारी
२३) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
२४) सर्व महानगरपालिका आयुक्त,
२५) सर्व पोलीस आयुक्त / सर्व पोलीस अधीक्षक,
२६) सर्व मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख/ प्रादेशिक प्रमुख
२७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
२८) निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
२९) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई -४०००३२,



Scanned with CamScanner

**परिशिष्ट 'अ'**

| अ. क्र. | विभाग | ज्या कार्यालयांना ५ दिवसांच्या आठवड्याबाबतचे आदेश लागू नाहीत, त्या कार्यालयांची नांवे |
|---|---|---|
| १) | जलसंपदा विभाग | दापोडी, सातारा, वर्धा येथील कर्मशाळा, अकोला, अहमदनगर, आष्टी, खडकवासला, नाशिक व नांदेड येथील प्रादेशिक कर्मशाळा, नागपूर येथील शासकीय मध्यवर्ती कर्मशाळा, भंडारा येथील कर्मशाळा, जलसंपदा व सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गत क्षेत्रिय कामावरील / प्रकल्पावरील नियमित आस्थापना, रुपांतरीत स्थायी / अस्थायी आस्थापना, कार्यव्ययी आस्थापना व रोजंदारी आस्थापनावरील क्षेत्रिय कामगार व कर्मचारी. |
| २) | सार्वजनिक आरोग्य विभाग | व्हॅक्सिन इन्स्टिट्युट, नागपूर |
| ३) | महसूल व वन विभाग | बल्लार शहा, परतवाडा व डहाणू येथील एकात्मिकृत घटके, अल्लापल्ली येथील शासकीय मालकीची सॉ मिल, विभागीय वन अधिकारी (वाहतूक व व्यापार) यांच्या नियंत्रणाखालील परतवाडा व बल्लारशहा येथील वर्कशॉप, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे. |
| ४) | सामान्य प्रशासन विभाग | शासकीय परिवहन सेवेचा कारखाना विभाग |
| ५) | कृषि व पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग | दुग्धशाळा विकास विभागांतर्गत कारखाना अधिनियम लागू असलेल्या दुग्ध योजना |
| ६) | उद्योग, उर्जा व कामगार विभाग | शासकीय मुद्रण व लेखनसामग्री संचालनालयांतर्गत येणारी मुद्रणालये. |
| ७) | कौशल्य विकास व उद्योजकता विभाग | व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील औद्योगिक प्रशिक्षण संस्था |
| ८) | अत्यावश्यक सेवा | शासकीय रुग्णालये / चिकित्सालये, पोलिस, कारागृहे, पाणीपुरवठा प्रकल्प / योजना, अग्निशमन दल व सफाई कामगार |
| ९) | शैक्षणिक संस्था | शासकीय महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, शाळा, तंत्रनिकेतन |



Scanned with CamScanner